************************************ ISSN 2320-0197 **

# जोन रॉबिन्सन: आर्थिक तत्त्वज्ञानाचा समकालीन परिप्रेक्ष्यातील अभ्यास

**डॉ. समित माहोरे**

सहयोगी प्राध्यपक,

पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त),

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर.

drsamitmahore@gmail.com

**प्रस्तुत लेख हा विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४८व्या अधिवेशनातील ग्रंथ-परिचय व्याख्यानाकरिता निवडलेल्या जोन रॉबिन्सन यांच्या 'आर्थिक तत्वज्ञान' (Economic Philosophy) या ग्रंथावर दिलेल्या भाषणाचा सारांश आहे.**

## जोन रॉबिन्सन: प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

जोन व्हायलेट रॉबिन्सन (१९०३–१९८३) या केंब्रिज विद्यापीठातील नामवंत अर्थशास्त्रज्ञ होत्या. त्यांनी गिरटन कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे शिक्षण घेतले आणि पुढे 'केंब्रिज स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये प्रभावशाली भूमिका बजावली. भारतातील वास्तव्यामुळे आलेला अनुभव व संशोधनामुळे त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला. त्यांनी अपूर्ण स्पर्धा, केन्सवादी अर्थशास्त्र, भांडवल संचय आणि मार्क्सवादी अर्थशास्त्र या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या 'अपूर्ण स्पर्धेचे अर्थशास्त्र' "The Economics of Imperfect Competition" (१९३३) या ग्रंथाने नवपरंपरागत अर्थशास्त्राला आव्हान दिले. केन्सच्या रोजगार व मागणी-आधारित संकल्पनांवर त्यांनी सखोल कार्य केले; तसेच मार्क्सवादी शोषण सिद्धांतावर टीका करत नव्याने मांडणी केली. भारतातील आर्थिक नियोजन, फेबियन समाजवाद व विकासावर त्यांनी भाष्य केले. त्यांचे विचार रिकार्डो, शुम्पीटर, सॅम्युअल्सन, आणि फ्रीडमन यांच्या संकल्पनांवर टीकेच्या स्वरूपात विकसित झाले. अर्थशास्त्र हे मूल्य-मुक्त विज्ञान नसून सामाजिक व तत्त्वमीमांसिक प्रभावांखाली असते असे त्यांचे स्पष्ट मत होते. १९७९ मध्ये त्या केंब्रिजमधील पहिल्या महिला प्राध्यापक बनल्या. नोबेल पारितोषिक न मिळाल्याचे दुर्दैव असले तरी, आधुनिक आर्थिक विचारसरणीतील त्यांचे योगदान अद्वितीय आहे.

*'आर्थिक तत्वज्ञान'* या जोन रॉबिन्सन यांच्या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे पहिले संस्करण १९६२ मध्ये आणि दुसरे संस्करण १९९१ मध्ये प्रकाशित झाले. दुसऱ्या संस्करणासाठी शीलिया डॉव यांनी प्रस्तावना लिहिली असून, त्या रॉबिन्सन यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित करतात. शीलिया डॉव सांगतात की रॉबिन्सन यांनी पारंपरिक अर्थशास्त्रावर कठोर टीका केली आणि अर्थशास्त्र केवळ वैज्ञानिक, मूल्य-मुक्त शास्त्र नसून त्यामागे वैचारिक व नैतिक प्रभाव कार्यरत असतो, हे ठामपणे मांडले.

प्रस्तावनेमध्ये त्यांनी अर्थशास्त्राची विचारसरणी, अर्थशास्त्रज्ञांची जबाबदारी आणि अर्थशास्त्राची पुनर्रचना या तीन मुख्य मुद्यांवर भर दिला आहे. डॉव यांच्यामते, अर्थशास्त्राचे सामाजिक व राजकीय पैलू समजून घेण्यासाठी रॉबिन्सन यांचे विचार आजही अत्यंत महत्त्वाचे आहेत. या ग्रंथात एकूण सहा प्रकरणे आहेत, जी अर्थशास्त्राच्या तत्त्वज्ञानाशी निगडित मूलभूत मुद्द्यांवर भाष्य करतात.

## प्रकरण १ - तर्कमीमांसा, नैतिक मूल्ये, आणि वैज्ञानिक पद्धती (Metaphysics, Morals and Science)

जोन रॉबिन्सन या प्रकरणात अर्थशास्त्राचे स्वरूप, त्याचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये आणि वैज्ञानिक परिमाण यांचा सखोल आढावा घेतात. त्या स्पष्ट करतात की अर्थशास्त्र

केवळ एक शुद्ध, वस्तुनिष्ठ आणि प्रयोगशील विज्ञान नाही, तर त्यामध्ये तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन, मूल्यव्यवस्था आणि मानवी आचरण समाविष्ट असतो. त्या म्हणतात की अर्थशास्त्रात वापरण्यात येणाऱ्या अनेक संकल्पना—जसे की "मूल्य", "मागणी", "पुरवठा"—या निश्चित व्याख्येत बसत नाहीत, पण तरीही त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. 'मूल्य' ही संकल्पना विश्लेषित करताना त्या सांगतात की अर्थशास्त्रात गूढ व ठोस संकल्पनांना समजावून सांगताना तात्त्विक पद्धतींचा वापर होतो, आणि त्यामुळे ही शास्त्रशाखा केवळ परिमाणात्मक न राहता गुणात्मकही ठरते.

रॉबिन्सन असे नमूद करतात की कोणतेही आर्थिक विश्लेषण वस्तुनिष्ठ असण्याचा दावा करू शकत नाही, कारण अर्थशास्त्रज्ञ स्वतःच्या वैचारिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या आधारे विश्लेषण करतात. उदाहरणार्थ, ॲडम स्मिथ यांची बाजारपेठेतील 'अदृश्य हात' ही संकल्पना एक प्रकारचा तात्त्विक विश्वास आहे की बाजार स्वयंनियंत्रित असतात, तर मार्क्स यांच्या दृष्टिकोनातून समाजातील विषमता आणि शोषण महत्त्वाचे ठरते. त्यामुळे त्या सांगतात की प्रत्येक आर्थिक सिद्धांतामागे काही विशिष्ट विचारधारा आणि नैतिक पूर्वग्रह लपलेले असतात. आर्थिक निर्णय हे बहुतांशी सामाजिक, भावनिक व अपूर्ण माहितीच्या आधारे घेतले जातात, केवळ तर्कशुद्ध विचारावर आधारित नसतात. म्हणून पारंपरिक व नव-पारंपरिक अर्थशास्त्रातील गृहीतकेही विचारात घेण्याजोगी आहेत.

या प्रकरणात लेखिका विचारधारेचा तात्त्विक विश्लेषण करून सांगतात की "विचारधारा" म्हणजे केवळ एक बिंदू नसून ती 'हत्ती'सारखी व्यापक, अनुभवात्मक आणि समाजावर प्रभाव टाकणारी संकल्पना आहे. यासाठी केवळ तार्किक व्याख्यांची गरज नाही, तर निकषांची गरज आहे—म्हणजेच, विशिष्ट कृती किंवा धोरण कोणासाठी, किती आणि कसे उपयुक्त ठरते याचा सामाजिक संदर्भातून विचार होय. त्या सांगतात की आर्थिक धोरणे जरी राष्ट्रीय फायद्याच्या नावाखाली मांडली गेली, तरी अनेकदा त्याचा उपयोग विशेष गटांना होतो.

नैतिकतेच्या अनुषंगाने त्या सांगतात की वितरण, न्याय, आणि सामाजिक जबाबदारी ही केवळ आकडेवारीची नव्हे तर मूल्यांसंबंधित प्रश्न आहेत. ॲडम स्मिथ यांनी सांगितलेल्या नैतिक सहानुभूतीच्या भावनांचा संदर्भ देऊन त्या स्पष्ट करतात की आर्थिक व्यवहारात इतरांच्या संपत्तीचा आदर, प्रामाणिकपणा आणि सहजीवनाचे मूल्य महत्वाचे ठरतात. जर समाजात हे मूल्यमापन नसेल, तर सामाजिक व्यवहार टिकू शकत नाहीत. डॉ. जॉन्सन यांच्या विचारांचा हवाला देत त्या नमूद करतात की समाजाचे आरोग्य आणि सुरक्षितता ही नैतिकतेवर आधारित असते.

शास्त्रीय दृष्टिकोनातून त्या सांगतात की अर्थशास्त्रात वैज्ञानिक पद्धतींचा वापर करता येतो, पण नियंत्रित प्रयोगांची मर्यादा, वैयक्तिक पूर्वग्रह, आणि सामाजिक गुंतागुंत यामुळे या प्रक्रियेत अडथळे येतात. पारंपरिक विज्ञानात प्रमाणित प्रयोग व पुन्हा चाचणी करणे शक्य असते, पण अर्थशास्त्रात मानवी वर्तन बदलते असल्यामुळे अचूक व सार्वत्रिक निष्कर्ष देणे कठीण जाते. गृहीतके अनेकदा वास्तवाशी विसंगत असतात, त्यामुळे अर्थशास्त्रात वस्तुनिष्ठतेऐवजी विवेकी परीक्षण आणि खुले संवाद अधिक गरजेचे ठरतात.

रॉबिन्सन प्रकरणाच्या शेवटी सांगतात की अर्थशास्त्राचे कार्य हे केवळ गणितीय प्रारूप मांडणे नव्हे, तर ते समाजात वास्तववादी आणि नैतिकदृष्ट्या जबाबदार भूमिका पार पाडणारे असले पाहिजे. आर्थिक धोरणे तयार करताना सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीय घटकांचा विचार करणे अनिवार्य आहे. तटस्थतेच्या नावाखाली मूल्यशून्यता स्वीकारणे धोकादायक आहे. त्या सांगतात की अर्थशास्त्राच्या अभ्यासात समांतरपणे विचारधारा, नैतिकता आणि वैज्ञानिक भान यांचा समतोल साधणे अत्यावश्यक आहे. आर्थिक सिद्धांत विशिष्ट गृहीतकांवर आधारित असतात आणि ते नेहमीच

वास्तवाला लागू पडतील असे नाही. म्हणूनच, अर्थशास्त्राच्या अभ्यासात तटस्थता, वास्तववाद आणि सामाजिक संदर्भांचा विचार आवश्यक आहे.

**प्रकरण 2 - परंपरागत - मूल्य (The Classics – Value)**

जोन रॉबिन्सन यांचे *आर्थिक तत्वज्ञान* या पुस्तकातील दुसरे प्रकरण हे मूल्य या संकल्पनेच्या ऐतिहासिक, तात्त्विक आणि सामाजिक संदर्भांचे विश्लेषण करते. त्या ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांच्या आधारे मूल्याच्या संकल्पनेचा मागोवा घेतात. मूल्य ही केवळ वस्तूच्या बाजारभावाशी निगडित गोष्ट नसून तिच्यामागे श्रम, उत्पादन खर्च, सामाजिक आणि राजकीय संरचना, आणि नैतिकता या घटकांचे गुंतागुंतीचे जाळे आहे. रॉबिन्सन सांगतात की मूल्य म्हणजे उपयोगिता नसून त्याला विनिमय मूल्य आणि उपयोग मूल्य अशा दोन अंगांनी समजले जाते. पाण्याचा उपयोग मोठा असला तरी त्याचे विनिमय मूल्य कमी आहे, तर हिऱ्याचे उलट आहे – हे 'पाणी-हिरा विरोधाभास' अर्थशास्त्रातील मूलभूत कोडे आहे.

या संदर्भात, ॲडम स्मिथचा श्रममूल्य सिद्धांत महत्त्वाचा आहे. त्याने आदिम समाजात वस्तूंची देवाणघेवाण श्रमाच्या प्रमाणावर आधारित होती, हे सांगितले. परंतु समाज जसा जटिल होत गेला, तसे कौशल्य, मालकी आणि नफा हे घटकही मूल्य ठरवण्यात महत्त्वाचे ठरले. स्मिथच्या दृष्टीने ‘अदृश्य हात’ ही बाजारातील समतोल राखणारी नैसर्गिक यंत्रणा होती. रॉबिन्सन त्याच्या विचारांत नैतिक व तात्त्विक सीमांचाही निर्देश करतात – विशेषतः उत्पादक व अनुत्पादक श्रम यामधील फरक लक्षात घेतात.

डेव्हिड रिकार्डोने स्मिथच्या सिद्धांतात सुधारणा करत उत्पादन खर्च, जमीन, भांडवल व मजुरी यांचा विचार करून मूल्य ठरवले पाहिजे असे मांडले. त्यांनी दीर्घकालीन व अल्पकालीन किंमती यामधील भेद स्पष्ट केला आणि शेतीवरील खंडाच्या संकल्पनेतून मूल्यनिर्धारणाचे मुद्दे विशद केले. श्राफा यांचा उल्लेख करत रॉबिन्सन रिकार्डोच्या भूमिकेचा परिप्रेक्ष्यात्मक अभ्यास करतात. मात्र रिकार्डोचे विश्लेषण अत्यंत तांत्रिक असून त्यात नैतिक वा वैचारिक आशयाची कमतरता आहे.

या तुलनेत, कार्ल मार्क्सचा दृष्टिकोन भांडवलशाहीतील शोषणावर केंद्रित आहे. त्याने 'अधिशेष मूल्य' सिद्धांत मांडला – म्हणजेच मजुरांना त्यांच्या श्रमाच्या पूर्ण किमतीपेक्षा कमी वेतन दिले जाते आणि उर्वरित नफा भांडवलदार ठेवतात. मार्क्सचे विश्लेषण फक्त आर्थिक नसून तत्त्वमीमांसिक व सामाजिक आहे. तो उत्पादक व अनुत्पादक श्रम, वस्तूंचे अमूर्त उपयोग मूल्य, आणि आर्थिक अन्याय यावर प्रकाश टाकतो. रॉबिन्सन यावरून दाखवतात की मार्क्सचा उद्देश्य भांडवलशाहीवर केवळ आरोप करणे नव्हता, तर तिचा तार्किक वेध घेणे होता.

या प्रकरणाच्या शेवटी, रॉबिन्सन स्पष्ट करतात की मूल्य ही केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक संकल्पना आहे. आज जरी बाजारात किंमती मागणी-पुरवठ्यावर आधारित असल्या तरी मूल्य ही संकल्पना अधिक सखोल आहे. ती उत्पादन, वितरण आणि सामाजिक समता यांशी निगडित आहे. श्रम, नफा, मालकी, न्याय, नियोजन आणि किंमत या सर्व संकल्पना मूल्याभोवती फिरतात. म्हणूनच मूल्याचा अभ्यास हा केवळ तांत्रिक अभ्यास नसून तो राजकीय, नैतिक आणि मानवी मूल्यांशी जोडलेला आहे. रॉबिन्सन यांच्या मते, मूल्य ही एक अशा प्रकारची संकल्पना आहे, जिचा शास्त्रीय अभ्यास करता येतो, पण तिचे निर्णायक उत्तर मिळवणे हे आजही कठीण आहे. कारण मूल्य हे स्वतःमध्ये एक विचारप्रणाली आहे आणि अर्थव्यवस्थेतील मूल्यनिर्धारण ही समाजरचना व धोरणांवरही अवलंबून असते.

दुकानांमध्ये विकल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमती ह्या त्यांच्या मूल्यांच्या प्रमाणात बनवण्याकरता, गुंतवणुकीसाठी निधी गोळा करणे, मजुरी बिलावर

एकसमान कर लागू करणे आणि किमतींत करासह समाविष्ट करणे आवश्यक आहे. अशा प्रणालीची शिफारस करण्यासारखे बरेच काही असले तरी त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. पुरवठा आणि मागणीच्या अटींनुसार किंमती ठरणे आवश्यक आहे, कारण मूल्ये सर्व विशिष्ट टंचाईवर मात केल्यावरच मागणी किमतीशी सुसंगत होतील, जेणेकरून प्रत्येक वस्तूचा वैयक्तिकरित्या उत्तम प्रकारे लवचिक पुरवठा होतो. अशा प्रकारच्या किंमतींच्या प्रणालीचा प्रयत्न केला गेला नाही आणि समाजवादी सिद्धांतामध्ये सापेक्ष किमतींबद्दल कोणतेही स्पष्ट सिद्धांत दिसत नाही. राजकीय अर्थव्यवस्थेचा ग्रंथ आपल्याला फक्त हेच सांगतो की 'किंमतीच्या नियोजनात मूल्याच्या नियमाचे कार्य विचारात घेतले जाते'; पण कसे ते सांगत नाही.

रॉबिन्सन या प्रकरणाच्या शेवटी असे सांगतात की मूल्याची संकल्पना ही केवळ तांत्रिक अर्थाने महत्त्वाची नाही, तर ती सामाजिक आणि राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची आहे. परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेले मूल्यविषयक सिद्धांत हे आधुनिक काळातही महत्त्वाचे आहेत, कारण: परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी श्रम आणि उत्पादनाच्या आधारे मूल्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. आधुनिक काळात, किंमत ठरवण्यासाठी *मागणी-पुरवठा, उत्पादन खर्च, नफा आणि बाजारातील शक्ती* हे सर्व घटक महत्त्वाचे ठरतात. तरीही, "अंतर्गत मूल्य" नक्की काय आहे, यावर अर्थशास्त्रज्ञ आजही एकमतास आलेले नाहीत. हे मूल्याच्या सर्व विविध अर्थांपैकी एक आहे, उत्पादन व्यायानुसार वाजवी किंमत (Just Price) संकल्पना जुनी आहे, ॲडम स्मिथने प्रत्येक प्रजातीला शिकारींना पकडण्यासाठी लागणाऱ्या वेळेच्या आधारावर त्यांच्या खेळाची अदलाबदल केली. किंमती अशा (राजकीय गरजेच्या अधीन) असाव्यात की देशात आणि शहरात एका दिवसाच्या कामातून समान उत्पन्न मिळते. परंतु जरी हे आदर्श म्हणून मंजूर केले गेले तरीही भिन्न वातावरणात भिन्न प्रकारचे जीवन जगणाऱ्या व्यक्तींसाठी समतुल्य उत्पन्न काय मानले जावे याची गणना करण्याची समस्या अजूनही आहे. मूल्य मदत करणार नाही. त्यात कोणतीही कार्यरत सामग्री नाही. तो फक्त एक शब्द आहे

**प्रकरण ३- नव-परंपरागत : उपयोगिता (The Neo-Classics: Utility)**

जोन रॉबिन्सन यांच्या *आर्थिक तत्वज्ञान* ग्रंथातील तिसऱ्या प्रकरणात नव-परंपरागत अर्थशास्त्रात उपयोगिता संकल्पनेचे स्थान, तिचे गृहितक व मर्यादा यांचे परखड विश्लेषण करण्यात आले आहे. नव-परंपरागत अर्थशास्त्र ग्राहकाच्या वागणुकीचे स्पष्टीकरण देताना, प्रत्येक निर्णय तर्कशुद्ध असून तो 'जास्तीत जास्त उपयोगिता' मिळवण्यासाठी घेतला जातो, असे मानते. १९ व्या शतकात जेव्हन्स, मेंगर व वॉल्रस यांनी "सीमांत उपयोगिता" सिद्धांत मांडला आणि या सिद्धांतावर आधारित गणितीय प्रारूप तयार केले. जेव्हन्सने बेन्थमच्या तत्त्वज्ञानावर आधारित वापराच्या प्रमाणात समाधान मोजण्याचा प्रयत्न केला, तर वॉल्रसने मागणी-पुरवठा वक्रांमधून मूल्यनिर्धारणाचे प्रारूप उभे केले. मार्शलने आंशिक समतोल विश्लेषणाद्वारे दीर्घकालीन आर्थिक प्रक्रियांचा विचार केला आणि औद्योगिक जीवनचक्र, तंत्रज्ञान व लोकसंख्येतील बदल यांचा समावेश केला. या अर्थशास्त्रज्ञांनी उपयोगिता ही मोजता येणारी, गणितीय स्वरूपात दर्शवता येणारी व सार्वत्रिक संकल्पना असल्याचे गृहीत धरले.

यावर जोन रॉबिन्सन कठोर टीका करतात. त्यांच्या मते उपयोगिता ही एक व्यक्तिनिष्ठ, सापेक्ष व तात्विक संकल्पना असून, ती मोजता येऊ शकत नाही. विविध व्यक्तींच्या पसंती, गरजा, परिस्थिती आणि सामाजिक प्रभाव वेगवेगळे असतात. म्हणजेच, तर्कशुद्धतेचे गृहितक प्रत्यक्ष व्यवहारात तितकेसे उपयोगी पडत नाही. ग्राहक भावनिक, अपूर्ण माहितीवर आधारित व समाज-सांस्कृतिक प्रभावाखाली निर्णय घेतो. शिवाय, सीमांत उपयोगितेचा नियम अनेक प्रसंगी लागू होत नाही— विशेषतः व्यसनाधीन वस्तूंमध्ये. किंमत ही फक्त

उपयुक्ततेवर अवलंबून नसून, ती उत्पादन खर्च, सामाजिक घटक, राजकीय हस्तक्षेप, व नियामक धोरणांवरही अवलंबून असते. 'पाणी-हिरा विरोधाभास' हे स्पष्ट दाखवते की वस्तूंची किंमत व उपयुक्तता यामध्ये थेट संबंध नसतो.

रॉबिन्सन वापराच्या सिद्धांतातील आणखी एका महत्त्वाच्या मर्यादेवर प्रकाश टाकतात – ती म्हणजे आर्थिक विषमता. नव-परंपरागत संकल्पना वैयक्तिक निवडीवर भर देतात, परंतु निवडीच्या संधींमध्ये समानतेचा अभाव असतो. गरीब व्यक्तींच्या पर्यायांची मर्यादा हीच त्यांची 'तर्कशुद्धता' ठरवते. त्यामुळे उपयोगिता महत्तमीकरण "Utility Maximization" ही संकल्पना सर्वांवर सारखी लागू होत नाही. रॉबिन्सन बाजारपेठ ही वस्तूंमधील उपयुक्ततेचे प्रतिबिंब दाखवते या गृहितकालाही आव्हान देतात. त्या म्हणतात की बाजारात विक्रेते व ग्राहक दोघांनाही संपूर्ण माहिती नसते; त्यामुळे व्यवहार नेहमीच 'इष्टतम' नसतो.

रॉबिन्सन नव-परंपरागत अर्थशास्त्राच्या मुक्त व्यापारासंबंधीच्या गृहितकांनाही नाकारतात. मुक्त व्यापार 'परिपूर्ण स्पर्धा', 'पूर्ण रोजगार' आणि 'आंतरराष्ट्रीय संतुलन' या आदर्श गृहितकांवर अवलंबून असतो, जे वास्तवात दुर्मीळ असतात. आर्थिक धोरणे राबवताना या गृहितकांची अंमलबजावणी अशक्य असल्यामुळे, हे सिद्धांत वास्तवाच्या समस्यांवर उत्तर देण्यात अयशस्वी ठरतात.

तथापि, रॉबिन्सन यांचा अंतिम निष्कर्ष असा आहे की नव-परंपरागत उपयोगिता सिद्धांत ही एक काल्पनिक आणि संकुचित चौकट आहे. वास्तविक जीवनातील आर्थिक वर्तन समजून घेण्यासाठी सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक शक्ती-संबंधांचा विचार करणारे अभ्यास आवश्यक आहेत. नव-परंपरागत सिद्धांतांनी व्यावहारिकतेऐवजी आदर्श कल्पनांना अधिक महत्त्व दिले आणि म्हणूनच ते अर्थशास्त्राला वास्तवाशी जोडण्यात अपयशी ठरले. त्यांच्या मते, अर्थशास्त्र फक्त तर्कशुद्ध गणितीय प्रारूप नव्हे, तर ते मानवी समाज, विषमता आणि शक्तीच्या संधी यांचा अभ्यास करणारी शास्त्रशाखा असली पाहिजे.

**प्रकरण ४ - केन्सवादी क्रांती (The Keynesian Revolution)**

*आर्थिक तत्वज्ञान* या पुस्तकाच्या चौथ्या प्रकरणात "The Keynesian Revolution" या विषयावर सविस्तर चर्चा केली आहे. त्या नव-परंपरागत अर्थशास्त्रावर केन्सच्या विचारसरणीने केलेल्या क्रांतिकारी प्रभावाचे विश्लेषण करतात. नव-परंपरागत विचारांमध्ये अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण आणि संतुलन साधणारी मानली जाते, परंतु १९२९ च्या महामंदीनंतर हे गृहितक अपयशी ठरले. जॉन मेनार्ड केन्स यांनी दाखवून दिले की, अर्थव्यवस्थेचे संतुलन काही वेळा बेरोजगारीसहही टिकू शकते आणि त्यामुळे सरकारचा हस्तक्षेप अनिवार्य आहे. केन्सने प्रभावी मागणीचा सिद्धांत मांडला आणि मागणी आधारित अर्थशास्त्राचा पाया रचला. 'से' च्या नियमाला विरोध करत त्यांनी सांगितले की, पुरवठा नव्हे तर मागणी ही अर्थव्यवस्थेची चालना असते. त्यामुळे मंदीच्या काळात सरकारने सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे मागणीला चालना द्यावी, अशी त्यांनी शिफारस केली.

बचत ही आपोआप गुंतवणुकीत परिवर्तित होते हा नव-परंपरागत विश्वास केन्सने फेटाळला. उद्योजकांची मनोवृत्ती, भविष्याविषयीची अनिश्चितता, आणि सरकारचा हस्तक्षेप यावर गुंतवणूक अवलंबून असते. त्यांनी स्पष्ट केले की, मंदीच्या काळात बचत कमी करून सार्वजनिक खर्च वाढवणे जास्त योग्य ठरते. याशिवाय, त्यांनी राजकोषीय धोरणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, फक्त व्याजदर घटवून आर्थिक पुनरुज्जीवन शक्य नाही. केन्सच्या विचारांनुसार, बेरोजगारी ही अपुरी मागणी आणि गुंतवणुकीच्या कमतरतेमुळे होते, केवळ मजुरीतील लवचिकतेमुळे नाही. त्यांनी नव-परंपरागत तत्त्वज्ञांच्या कल्पनांचा विरोध केला की, कमी वेतनामुळे रोजगार वाढतो, कारण

त्यानुसार खरेदीशक्ती घटल्याने मागणीही घटते. त्यामुळे रोजगार, उत्पन्न आणि मागणी टिकवण्यासाठी सरकारची भूमिका निर्णायक ठरते. १९३० ते १९७० या काळात केन्सच्या विचारांनी कल्याणकारी राज्यांची संकल्पना पुढे आली. पण १९७० नंतर महागाई वाढल्याने केन्सीयन विचारांवर टीका होऊ लागली आणि नव-उदारमतवादी धोरणांना प्राधान्य मिळाले. केन्सने खासगी स्वार्थावर आधारित सार्वजनिक हिताच्या संकल्पनेला विरोध केला आणि विवेकाधारित विकास, युक्ततम हस्तक्षेप आणि सामाजिक गरजांवर भर दिला. त्यांनी बाजार व्यवस्थेवर संपूर्ण विश्वास न ठेवता सरकारकडून नियोजनबद्ध हस्तक्षेपाची गरज प्रतिपादित केली. त्यांनी प्रशुल्कावरील नव-परंपरागत विरोधाचा विरोध करत संरक्षणात्मक शुल्काचा बचाव केला. रॉबिन्सन केन्सच्या विचारांचे समर्थन करताना त्यांच्या मर्यादाही अधोरेखित करतात. त्या म्हणतात की केन्सीयन विचारधारा भांडवलशाहीस पोषक आहे, पण ती सामाजिक आणि आर्थिक असमतोल यांकडे दुर्लक्ष करते. त्या शक्ती-संबंध, उत्पन्नवाटप आणि दीर्घकालीन नियोजनातील कमतरता या बाबींवर केन्सीयन धोरणांची टीका करतात.

पूर्ण रोजगार ही संकल्पनाही त्या संशयास्पद मानतात कारण ती महागाई वाढवू शकते. मिचेल कलेकी यांची उदाहरणे देत त्या म्हणतात की, पूर्ण रोजगारासाठी गुंतवणूकदारांचा विरोध आणि सरकारवरचा दबाव बेरोजगारीच्या एका विशिष्ट पातळीला 'आवश्यक' मानतो. परिणामी, सरकार रोजगार निर्माणाऐवजी तुटीच्या भीतीने दबावात राहते. केन्सने मांडलेल्या आर्थिक हस्तक्षेपाच्या साधनांमध्ये कर आकारणी, सार्वजनिक खर्च, व्याजदरात बदल आणि सामाजिक सेवांमध्ये गुंतवणूक यांचा समावेश होतो. पण ही साधने बाजारशक्तींनी नियंत्रित वातावरणात कशी प्रभावीपणे वापरायची हाच रॉबिन्सनला प्रश्न पडतो. एकंदर, हे प्रकरण केन्सीयन क्रांतीचे तात्त्विक व व्यावहारिक परिणाम स्पष्ट करत आधुनिक अर्थशास्त्राच्या पुनर्विचारासाठी आवश्यक आधार देतात.

**प्रकरण ५ - विकास आणि अर्ध-विकास (Development and Under-development)**

या पुस्तकातील पाचवे प्रकरण हे आर्थिक विकास व न्यून विकास या संकल्पनांची खोलवर चर्चा करते. रॉबिन्सन म्हणतात की विकास म्हणजे केवळ उत्पादनातील सकल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) वाढ नव्हे, तर तो रोजगार, उत्पन्नवाढ, आणि जीवनमानात सुधारणा या सर्व अंगांनी मोजला गेला पाहिजे. विकसित देश उद्योग, तंत्रज्ञान आणि भांडवल यामध्ये प्रगत असून त्यांना स्थिर शासन आणि उच्च पायाभूत सुविधा लाभतात. त्याउलट, विकसनशील देश कृषिप्रधान, कमी औद्योगिक, आणि विषम संपत्ती वितरणाने ग्रस्त आहेत. भारतासह, आफ्रिकन आणि लॅटिन अमेरिकन देश हे आजही या संघर्षात आहेत. रॉबिन्सन औद्योगीकरणाला विकासाचे केंद्र मानतात आणि मुक्त बाजारपेठेवर टीका करतात, कारण ती मोठ्या भांडवलशाही देशांना लहान देशांचे शोषण करण्यास प्रवृत्त करते. त्यांनी हॅरॉड-डोमर प्रारूपाचा उल्लेख करताना सूचित केले की बचत व तंत्रज्ञानप्रगत गुंतवणूक आवश्यक आहे, आणि हेच भारताच्या पंचवार्षिक योजनांचे मूळ होते. रॉबिन्सन आर्थिक इतिहासातील जुने सिद्धांत जसे की रिकार्डो, मार्क्स, व केन्स यांचे विश्लेषण करून सांगतात की नफ्याचे प्रमाण कालांतराने घटते आणि भांडवली गुंतवणुकीचे सीमांत उत्पादन कमी होते. हॅरॉड-डोमर प्रारूपाद्वारे त्यांनी सूचित केले की जर बचत वाढवली आणि ती अधिक उत्पादनक्षम भांडवली उपकरणांमध्ये वापरली गेली, तर वृद्धीचा दर वाढू शकतो. मात्र बचतीमुळे गुंतवणुकीला होणारा अडथळा कायम राहततो. गुंतवणुकीतील अनिश्चितता, जोखीम, आणि 'स्वायत्त गुंतवणूक' हे घटक महत्त्वाचे ठरतात.

विकासाचा इतिहास स्पष्ट करताना रॉबिन्सन वेबर, रोस्टोव व आयर्स यांच्या दृष्टिकोनाचा संदर्भ घेतात. वेबरच्या मते कॅल्व्हिनिस्ट नैतिकतेमुळे भांडवलशाहीला चालना मिळाली, तर आयर्सच्या मते युरोपने जुन्या कल्पना टाकून नवकल्पनांचा स्वीकार केला. तंत्रज्ञान,

संवाद, आणि नाविन्यपूर्ण शोधामुळे युरोपात औद्योगिक क्रांती शक्य झाली. रॉबिन्सन म्हणतात की अशाच प्रकारचे परिवर्तन आफ्रिकेसारख्या देशांसाठी गरजेचे आहे. लोकसंख्येच्या वाढीचा विचार करताना त्या माल्थसने दर्शविलेल्या धोक्याची आठवण करून देतात – की तुटपुंज्या संसाधनांवर अधिक लोकसंख्या ही संकट उभी करू शकते. त्यासाठी उत्पादनवाढ, संसाधनांचा कार्यक्षम वापर, आणि गुंतवणुकीचा योग्य विनियोग महत्त्वाचा आहे. मात्र त्यांनी सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला की केवळ दीर्घकालीन उत्पन्नवाढीच्या अपेक्षेने केलेली गुंतवणूक तात्काळ बेरोजगारी निर्माण करू शकते. 'नियोजनासाठी अर्थशास्त्र फारसे सांगत नाही' असा उपहासात्मक निष्कर्ष देऊन त्या म्हणतात की नियोजन करताना स्थितीची समग्र जाणीव आवश्यक आहे. तरीसुद्धा, सांख्यिकीय व गणितीय पद्धती अचूक वापरल्यास त्या फार उपयुक्त ठरू शकतात. रॉबिन्सन विकासाच्या अडथळयांमध्ये वसाहतवादाचा वारसा, संपत्तीचे केंद्रीकरण, परकीय आर्थिक प्रभुत्व, आणि शिक्षण व तंत्रज्ञानाचा अभाव या प्रमुख कारणांचा उल्लेख करतात. त्यांनी विकसनशील देशांसाठी विकासाचे धोरणही सुचवले – जसे की सरकारी हस्तक्षेप, संरक्षणवादी धोरणे, तांत्रिक शिक्षणावर भर, आणि कृषी-औद्योगिक समतोल. शेवटी त्या स्पष्ट करतात की विकास म्हणजे केवळ जीडीपी नव्हे, तर सामाजिक न्याय, समान संधी, आणि स्वावलंबन या मूल्यांचा समावेश असणे आवश्यक आहे. अशा समन्वित दृष्टीकोनातूनच विकसनशील देश वास्तविक प्रगती साधू शकतात.

### प्रकरण ६ - खेळाचे नियम काय आहेत? (What Are the Rules of the Game?)

*आर्थिक तत्वज्ञान* या पुस्तकातील सहाव्या प्रकरणात अर्थशास्त्रातील नियम, बाजारव्यवस्थेतील शक्तिसंरचना आणि धोरणनिर्मितीतील राजकीय प्रभाव यांची सखोल चिकित्सा केली आहे. त्या स्पष्ट करतात की अर्थशास्त्र हे केवळ वैज्ञानिक नियमांवर आधारित नसून, त्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय शक्तींचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर असतो. नव-परंपरागत अर्थशास्त्र हे बाजारपद्धतीला नैसर्गिक, समतोल साधणारी आणि तटस्थ समजते. मात्र, रॉबिन्सन यांचे मत आहे की या तथाकथित तटस्थ नियमांवर भांडवलदार, सरकार, आणि जागतिक संस्था यांसारखे शक्तिशाली घटक नियंत्रण ठेवतात. त्यामुळे नियम सर्वांसाठी सारखे राहात नाहीत; ते शक्तिशाली वर्गाच्या फायद्यासाठी बदलले जातात.

मुक्त बाजारपेठ ही संकल्पना जरी सर्वांसाठी संधीची वाट उघडणारी भासली, तरी वास्तवात मोठ्या कंपन्या आणि प्रगत देश लहान उद्योग आणि विकसनशील देशांवर वर्चस्व गाजवतात. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या लहान स्थानिक कंपन्यांना गिळंकृत करतात, ज्यामुळे मुक्त बाजारपेठेतील स्पर्धा अयोग्य व एकतर्फी होतात. या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका अधिक निर्णायक ठरते. पारंपरिक विचारसरणी सरकारच्या हस्तक्षेपाला विरोध करत असली तरी रॉबिन्सन आणि केन्स यांच्या मते, असमानता कमी करण्यासाठी सरकारचे करधोरण, गुंतवणूक धोरण, आणि सामाजिक योजनांचे नियमन गरजेचे आहे. विशेषतः कर प्रणालीमधील अन्यायकारक रचना—ज्यामध्ये श्रीमंत कंपन्यांना करसवलती दिल्या जातात आणि सामान्य लोकांवर अधिक कर लादला जातो—ही अर्थव्यवस्थेतील मूलभूत व्यवस्था अन्याय दाखवते.

मौद्रिक आणि राजकोषीय धोरणांची चर्चा करताना रॉबिन्सन दाखवतात की बँकांचे व्याजदर व चलन पुरवठा यांसारख्या गोष्टी केवळ आर्थिक साधने नसून, त्यावरही शक्तिसंस्थांचा प्रभाव असतो. व्याजदरात बदल केल्याने आर्थिक मागणी नियंत्रित करता येते, पण हे धोरण नेहमीच सर्वसामान्यांसाठी फायदेशीर ठरत नाही. त्याचप्रमाणे, राजकोषीय धोरणांतर्गत सरकार मोठ्या उद्योगांना मदत करताना सामान्य लोकांसाठीच्या कल्याणकारी योजना कमी करते.

जागतिक पातळीवर, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक अधिकोष यांसारख्या संस्था मुक्त व्यापाराच्या नावाखाली विकसनशील देशांवर अटी लादतात. विकसित देश कृषी अनुदान देऊ शकतात, पण विकसनशील देशांकडे ही क्षमता नसल्यामुळे त्यांच्या शेतकऱ्यांना जागतिक बाजारात स्पर्धा करता येत नाही. त्यामुळे बाजाराचे नियम सार्वत्रिक नसून सामर्थ्यानुसार बदलणारे असतात.

रॉबिन्सन संपत्तीच्या वितरणाच्या प्रश्नावरही प्रकाश टाकतात. पारंपरिक अर्थशास्त्र हे सांगते की संपत्ती मेहनतीवर मिळते, पण वास्तवात संपत्ती भूतकाळातील मालकी हक्क, भांडवल आणि वर्गीय विशेषाधिकारांवर आधारित असते. त्यामुळे गरिबांसाठी आणि श्रीमंतांसाठी नियम वेगळे असतात.

अखेर रॉबिन्सन म्हणतात की केवळ वैज्ञानिक विचाराने किंवा बाजारपद्धतीवर अवलंबून न राहता, अर्थशास्त्रात लोकशाही आणि नैतिकतेचा समावेश गरजेचा आहे. "नियम बदलल्याशिवाय खेळ बदलणार नाही" हे त्यांचे मुख्य सूत्र आहे. त्या अर्थशास्त्राला एक तटस्थ विज्ञान न समजता, विचारसरणी, सत्ताकारण आणि सामाजिक वास्तव यांचा परिपाक मानतात. त्यामुळे धोरणनिर्मिती करताना लोकहित, समता, आणि न्याय या मूल्यांचा विचार करणारे नियम आवश्यक आहेत. या प्रकरणातून जोन रॉबिन्सन या गोष्टी अधोरेखित करतात की, अर्थशास्त्र हे सत्तेच्या रचनेशी निगडित असून, त्याचा उपयोग केवळ सिद्धांत मांडण्यासाठी नव्हे तर समाज सुधारण्यासाठीही व्हायला हवा.

आर्थिक तत्वज्ञान या ग्रंथाच्या शेवटी जोन रॉबिन्सन अर्थशास्त्राच्या स्वरूपावर एक मर्मभेदी आणि चिंतनशील विचार मांडतात. त्या स्पष्ट करतात की अर्थशास्त्र ही केवळ वस्तुनिष्ठ विज्ञानशाखा नाही, तर ती नैतिक मूल्ये, राजकीय दृष्टिकोन आणि सामाजिक पर्यायांशी जोडलेली आहे. रॉबिन्सन यांचा ठाम विश्वास आहे की कोणतेही आर्थिक तत्त्वज्ञान हे त्या-त्या काळातील ऐतिहासिक व सामाजिक संदर्भांतूनच उगम पावते. म्हणूनच कोणतेही आर्थिक नियम "नैसर्गिक" किंवा अपरिवर्तनीय मानणे चुकीचे आहे. त्या सांगतात की अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या गृहितकांची आणि मूल्यमापनांची पारदर्शकता ठेवली पाहिजे, आणि आपले व्यक्तिगत पूर्वग्रह समजून घेतले पाहिजेत. त्यांच्या मते, आर्थिक धोरणे आखताना केवळ बाजाराच्या कार्यक्षमतेवर भर न देता सामाजिक कल्याण, समता आणि न्याय या मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे. शेवटी, रॉबिन्सन या पुस्तकातून अर्थशास्त्राला एका नैतिकदृष्ट्या जागरूक, सुस्पष्ट आणि जबाबदार शास्त्र म्हणून समोर आणतात — जे केवळ वास्तवाचे वर्णन करत नाही, तर समाज घडवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

**संदर्भ-**

Roninson, Joan, (2021), “Economic Philosophy”, forwarded by Sheila Dow, Routledge Publication, New York.

***